Review Of Research

ISSN: 2249-894X  Impact Factor : 3.8014(UIF)  Volume - 6 | Issue - 3 | December – 2016

UGC Approved Journal No. 48514

# संयुक्त राष्ट्र संघटना व मानवी अधिकार

प्रा. श्रीरंग शामराव लोखंडे

राज्यशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

## प्रस्तावना -

पहिले जागतिक महायुद्ध सन १९१४ ते १९१८ घडून गेले अन जगातील मानव समाजाला युद्धाची दाहकता, विध्वंसता लक्षात आली. त्यामुळे जगातील सर्व मानव समाजाला जागतिक शांततेविषयी काळजी वाटू लागली. त्यातून अमेरिकेचे तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या प्रयत्नातून इ.स. सन 1920 ला राष्ट्र संघाची स्थापना झाली. मात्र राष्ट्र राष्ट्रातील संघर्ष, ताणतणाव, साम्राज्यविस्ताराची भूक यातून सर 1939 ला दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला व राष्ट्रसंघाला जगात शांतता प्रस्थापित करण्याचा अपयश आले.

दुसऱ्या महायुद्धाची तीव्रता व दाहकता ही अतिशय जास्त असल्याने जगातील




मानव समाजाचे खूप नुकसान झाले. म्हणून नवीन अशा प्रभावी जागतिक संघटनेची गरज जगातील अनेक राष्ट्रांना जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने वाटू लागले आणि त्यातून अटलांटिक सनद, डंबार्टर्न ओक्स परिषद याल्ता परिषद आणि सॅनफ्रान्सिस्को परिषद परिषदांच्या परिणाम स्वरूप २४ ऑक्टोबर 1945 रोजी संयुक्त राष्ट्राचे स्थापना करण्यात आली.

## संयुक्त राष्ट्राचे ध्येय -

संयुक्त राष्ट्राच्या सनदीच्या प्रस्तावनेत संघटनेच्या ध्येयाचा उल्लेख आहे. तो पुढीलप्रमाणे

१. युद्धाच्या भयानक आपतीपासून भावी पिढयांचे रक्षण करणे.

२. मूलभूत मानवी हक्क, व्यक्तीच्या प्रतिष्ठा व मूल्ये आणि सर्व लहानमोठी राष्टे तसेच स्त्री पुरुष यांच्या समान हक्काविषयी विश्वास व्यक्त करणे.

३.आंतरराष्ट्रीय बंधना - संबंधी सन्मान व न्याय प्रस्थापित होईल अशी परिस्थिती निर्माण करणे.

४.सामाजिक प्रगती घडवून आणणे आणि जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करणे.

## संयुक्त राष्ट्राचे उद्दिष्टे -

सनदेच्या पहिल्या प्रकरणाच्या पहिल्या कलमात त्यांची उद्दिष्टांचा उल्लेख केला गेला आहे.

१. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकून ठेवणे.

२. समान हक्क व स्वयंनिर्णयाचे तत्व याद्वारे वेगवेगळ्या राष्ट्रांमध्ये मित्रत्वाचे संबंध निर्माण करणे.

३. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवतावादी समस्या सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविणे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जगातील निरनिराळ्या राष्ट्रांकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना योग्य परिस्थिती निर्माण करणे.

संयुक्त राष्ट्रसंघटनेची एकूण १९३ राष्ट्र सभासद असून त्यांची ६ विभाग कार्यरत आहेत. त्यात आमसभा, सुरक्षा समिती, आर्थिक आणि सामाजिक समिती, विश्वस्त समिती आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि सचिवालय व महासचिव हे होत. त्याबरोबरच संयुक्त राष्ट्राची एकूण १५ अभिकरणे व अनेक संघटना काम करतात. त्यामुळे जगातील तंटे संघर्ष मिटवून शांतता निर्माण करण्यात संयुक्त राष्ट्राला बऱ्याच अंशी यश प्राप्त झाले. मात्र मानवाच्या प्रतिष्ठा प्रस्थापनेसाठी. त्यांचे हक्क व अधिकार रक्षणासाठी, मानवाला माणूस म्हणून जगण्यासाठी, मानवी हक्कांची गरज भासू लागली. संयुक्त राष्ट्राच्या • आर्थिक व सामाजिक मंडळाने याच गरजेनुसार २१ जून १९४६ मध्ये एक मानवी हक्क आयोग स्थापन केला. या आयोगाने मानवी हक्कांचे संहितीकरण केले. त्यानुसार ऑलनेर रुजवेल्ट यांच्या अध्यक्षतेखाली या मानवी हक्क आयोगाने दोन वर्षांमध्ये जागतिक मानवी हक्काचा जाहिरनामा तयार करून युनोच्या महासभेत सादर केला. १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्काचा ३० कलमी जाहिरनामा मंजूर करण्यात आला.

## हक्कांची व्याख्या

१. टी. एच. ग्रीन यांच्या मते, "व्यक्तीच्या आंतरिक विकासासाठी असणारी बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होय."

२. प्रा. हेरॉल्ड लास्की यांच्या मते, "हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की ज्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला स्वतःची जास्तीत जास्त प्रगती घडवून आणता येत नाही.'

३. मॅकफरलेन यांच्या मते, "मानवी हक्क हे नैतिक हक्क असून जे प्रत्येक स्त्री व पुरुषांना माणूस म्हणून प्राप्त होतात."

## पॅरीस तत्त्वे

जगातील प्रत्येक राष्ट्राने आपली अंतर्गत धोरणे आंतरराष्ट्रीय आचारसंहितेच्या नियमांशी सुसंगत करण्याची बांधिलकी या हेतुने सन १९९१ मध्ये संयुक्त राष्ट्राद्वारे आयोजित परीस बैठकीत काही तत्त्वे स्वीकारण्यात आली. त्यांनाच पॅरीस तत्त्वे म्हणतात. त्यावर संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क आयोगाने २० डिसेंबर १९९३ रोजी त्याला मान्यता दिली.

पॅरीस तत्त्वाच्या अनुषंगाने सर्व मानवी हक्क समर्थक संस्थांनी खालील गोष्टीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. कायद्याने किंवा राज्यघटनेने बहाल केलेले स्वातंत्र्य

२. सरकारपासून स्वायत्तता

३. सभासदांची नियुक्ती व इतर बाबीमध्ये एकापेक्षा जास्त सभासदांचे प्रतिनिधित्व

४. वैश्विक मानवी हक्कांच्या निकषांवर साधारणपणे एकमत

५. पुरेशी संसाधने आणि संरचनांची उपलब्धता

६. व्यवहारामध्ये पारदर्शकता

## मानवी हक्काशी संबंधीत घटकसंख्या

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व ६ मुख्य शाखा या सर्वावर कमी अधिक प्रमाणात मानवी हक्कांच्या रक्षणाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तरीपण आंतरराष्ट्रीय संघटनेचे आमसभा आणि आर्थिक व सामाजिक समिती हे दोन विभाग मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य यांच्याशी विशेष संबंधीत आहेत. मानवी हक्काच्या

रक्षणाची जबाबदारी कार्यक्षमपणे व प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आमसभा व आर्थिक सामाजिक समिती या विभागाने वेगवेगळे आयोग, संघटना व समित्या स्थापन केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. मानवी हक्क आयोग/परिषद** : संयुक्त राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक समितीद्वारे २१ जून १९४६ रोजी मानवी हक्क आयोगाची स्थापना केली गेली. पुढे त्याचे रुपांतर १५ मार्च २००६ रोजी मानवी हक्क परिषदेत झाले. या परिषदेत ४७ राष्ट्रांची निवड आमसभा करते.

**२. महिला आयोग** : २१ जून १९४६ रोजी महिला आयोगाची स्थापना झाली. याची सदस्यसंख्या ४५ असून त्यांची निवड आर्थिक व सामाजिक समितीद्वारे केली जाते. महिलांच्या हक्काचे रक्षण करणे आणि त्यांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविणे ही जबाबदारी महिला आयोगाची होय. त्याचबरोबर स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठीही तो प्रयत्न करतो.

**३. अल्पसंख्यांकांसंबंधी उपआयोग** : इ.स. १९४७ मध्ये मानवी आयोगाने अल्पसंख्यांकांसंबंधीच्या उपआयोगाची स्थापना केली. त्यात २६ सदस्य असतात. अल्पसंख्यांक समूहाच्या हक्कांचे रक्षण करणे ही जबाबदारी या आयोगावर आहे. त्याचबरोबर अल्पसंख्यांकाबाबत कसलाही भेदभाव, कसलाही अन्याय केला जाणार नाही याची खबरदारी घेण्याचे काम त्यावर सोपविले आहे.

**४. निर्वासितांकरिता उच्चायुक्तांचे कार्यालय** : इ.स. १९४९ मध्ये निर्वासितांकरिता संयुक्त राष्ट्राच्या उच्चायुक्तांचे कार्यालय (Office of the United Nations High Commissioner मी for Refugees UNHCR) या संघटनेची स्थापना झाली. दुसऱ्या महायुद्धामुळे निर्वासित झालेल्या लोकांच्या प्रश्नाला विशेष महत्त्व प्राप्त झाले त्यांचे अस्तित्व, मानवी हक्क हिरावून गेल्याने अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले. त्या प्रश्नांची दखल घेत संयुक्त राष्ट्रसंघटनेने या कार्यालयाची स्थापना केली.

**५. आंतरराष्ट्रीय कायदा आयोग**

संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने २१ नोव्हेंबर १९४७ रोजी आंतरराष्ट्रीय कायदा आयोगाची स्थापना केली. या आयोगाने मानवी हक्क जपण्यासाठी काही संघटना निर्माण केल्या आहेत. संयुक्त वरील आयोगाशिवाय काही समित्याही मानवी हक्कांचे रक्षणार्थ स्थापन करण्यात आल्या आहेत.

**i. यांशिक भेदभाव निर्मूलन समिती** : वांशिक भेदभाव • निर्मूलन समितीची स्थापना इ.स. १९६९ मध्ये झाली. तिथे १८ सदस्य चार वर्षांसाठी निवडले जातात. जगात वंशाच्या आधारे मानवामधील होणारे भेदभाव थांबविण्यासाठी उपाययोजना करणे ही जबाबदारी होय.

**ii. मानवी हक्क समिती** : नागरी व राजकीय हक्कासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्याच्या भाग चारमधील ■ तरतुदीनुसार इ.स. १९७६ मध्ये मानवी हक्क समितीची स्थापना करण्यात आली. त्यात १८ सदस्य चार वर्षांकरिता निवडतात. नागरी व राजकीय हक्कासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे, करारनाम्यावरील सह्या केलेल्या राष्ट्रांना आवश्यक सूचना देणे व आलेल्या तक्रारीची दखल घेणे ही कार्य पार पाडते.

**iii. महिलासंदर्भात भेदभाव निर्मूलन समिती :** इ.स. १९८२ मध्ये या समितीची स्थापना झाली. त्यात २३ सदस्य चार वर्षांकरिता निवडले जातात. या समितीचे कार्य महिलांविरुद्ध केल्या जाणाच्या भेदभाव निर्मूलन करण्यासंबंधीच्या करारनाम्याची अंमलबजावणी कशी केली जाते यावर लक्ष ठेवणे, करारावर सहया केलेली राष्ट्रांना आवश्यक सूचना देणे ही कार्य ही समिती आपला अहवाल आमसभेला सादर करते.

**iv. बालकांच्या हक्कासंबंधी समिती :** या समितीची स्थापना १९९१ मध्ये करण्यात आली. त्यात १० सदस्य चार वर्षांकरिता निवडले जातात.

## बालकांच्या हक्कासंबंधीच्या करारनाम्यातील तरतुदीच्या

अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे हे मुख्य कार्य या समितीचे होय. त्याचबरोबर सदस्य राष्ट्रांना आवश्यक सूचना देते.

मानवी हक्कांशी संबंधीत वरील आयोग, समित्याशिवाय संयुक्त राष्ट्र आणखीही काही घटकांमार्फत मानवी हक्क रक्षण व संवर्धन करते. संयुक्त राष्ट्राने काही विशिष्ट कार्य पार पाडण्यासाठी विशेष अधिकरणे उदा. जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना, अन्न व कृषी संघटना इ. अभिकरणाच्या माध्यमातून मानवी हक्क रक्षणाबाबत कार्य केले आहे व करीत आहे.

## सारांश

जगातील राष्ट्राराष्ट्रात असणारे ताणतणाव, संघर्ष, दहशतवाद, हिंसाचार, भूकबळी, उपासमार, गरिबी इ. समस्यांना सामोरे जावून संयुक्त राष्ट्र मानवतेच्या हितार्थ, मानव अधिकारांच्या संरक्षणार्थ त्यांच्या संघटना, समित्यांकडून अतिशय प्रभावीपणे काम करत आहे. मानवाची प्रतिष्ठा, स्वातंत्र्याची जपवणूक करण्याचे कार्य चांगल्या पद्धतीने होत आहे. अशा रितीने मानवी हक्कांची अंमलबजावणी बऱ्याच अंशी संयुक्त राष्ट्राकडून व त्याच्या सदस्य राष्ट्राकडून होत आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. डॉ. सोलापुरे राजशेखर, मानवी हक्क आणि समाज, अरूणा प्रकाशन, लातूर
२. समग्र मानवी हक्क, के सागर पब्लिकेशन
३. शिंदे ज.रा., आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन्स
४. डॉ. जोरगुलवार भूषण, आंतरराष्ट्रीय संबंध
५. प्रा. पाटील बी.बी., प्रा. चव्हाण उर्मिला, ११ वी राज्यशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर
६. प्रा. पाटील बी.बी., प्रा. चव्हाण उर्मिला. १२ वी राज्यशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर
७. भोळे भा.ल., आंतरराष्ट्रीय संबंध, साकेत प्रकाशन, नागपूर